# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ८८ /२०२१-२२ दिनांक :- ०३/०६/२०२१

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

H.S.M
(हंसराज मेश्राम)
प्र. उप मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 89 /2021-22 दिनांक :- 03/06/2021

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या (नग) |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (पु.) येथील जेसलपार्क बिल्डींग नं.एफ-1,को.ऑ.हौ.सोसायटी च्या आवारात वाढलेले असून सदर झाडे बाजुला असलेल्या रहदारीच्या रस्त्यावर (आशिर्वाद हॉस्पीटल) झुकलेली आहेत. सदर झाडांच्या झावळया व नारळ पडून जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(जेसलपार्क बिल्डींग नं.एफ-1,को.ऑ.हौ.सोसायटी लि.यांचे दि.15/02/2021 रोजीचे पत्र.)** | 02 नग नारळ |
| 2. | भाईंदर (पु.) प्रभाग क्र.3 येथील तपस्याधाम आश्रमाच्या बाजुला मनपा रोडवरती वाढलेले असून सदर झाडाची मुळे आश्रमाच्या कंपाऊड भिंतीमध्ये गेलेली आहेत. त्यामुळे जोराच्या वाऱ्याने झाड व भिंत पडून जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(सन्मा.नगरसेविका सौ.निलम हरिश्चंद्र ढवण यांचे दि.15/03/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग सप्तपर्णी |
| 3. | भाईंदर (प.) येथील रकवी मार्ग, पथाडिया कॉम्पलेक्स समोर गांधी नगरच्या आवारात वाढलेले असून सदर झाड धोकादायक रित्या उंच असून जोराच्या वाऱ्याने झाड पडून खाली असलेल्या घरावर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(गांधी नगर रहिवाशी यांचे दि.24/05/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग नारळ |
| 4. | भाईंदर (प.) येथील शांती अपार्टमेंट नं.2 को.ऑ.हौ.सो.लि. यांच्या कंपाऊड वॉलवर धोकादायकरित्या वाढलेले असून झाडाची मुळे कंपाऊंड वॉलमध्ये जाऊन भिंतीला तडे गेलेले आहे. तरी झाडामुळे भिंत पडुन जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(शांती अपार्टमेंट नं.2 को.ऑ.हौ.सोसायटी लि.यांचे दि.31/05/2021 रोजीचे पत्र)** | 01 नग वड |
| 5. | भाईंदर (प.) येथील गीतानगर येथिल ज्योती अपार्टमेंटच्या समोर मनपा रोडवरती असुन झाड पुर्णपणे सुकलेले आहे. तरी सदर झाड जोराच्या वा-याने व पावसाने पडुन जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग)** | 01 नग गुलमोहर |
| 6. | भाईंदर (पु.) येथील जेसलपार्क येथिल मलःनिसारण केंद्र येथे असुन सदरचे झाड बाजुला असलेल्या मलःनिसारण केंद्राच्या इमारतीवर धोकादायकरित्या टेकलेले आहे. तरी सदर झाड जोराच्या वा-याने व पावसाने पडुन जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग)** | 01 नग जांभुळ |
| 7. | भाईंदर (प.)येथील मि.भा.मनपा मुख्य कार्यालयाच्या मागिल बाजुस इमारतीच्या आवारामध्ये असुन सदर झाडाची मुळे वरती येऊन कंपाऊंड वॉलवर धोकादायकरित्या टेकलेले आहे. तसेच मागिल बाजुस रस्ता असल्याने नागरिकांची ये-जा असते.तरी सदर झाड जोराच्या वा-याने व पावसाने पडुन जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग)** | 01 नग पेल्ट्रोफार्म |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

H.S.M

**(हंसराज मेश्राम)**
**प्र. उप मुख्य उद्यान अधिक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**